# मिरा-भाईंदर महानगरपालिका
# समाजविकास विभाग

## १) दिव्यांग व्यक्तींना स्टॉल परवाना देणेबाबत :-

| | |
|---|---|
| **कार्यक्षेत्र** | मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| **स्टॉल परवाना मिळविण्यासाठी आवश्यक कागदपत्रे** | १) ६० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा सिव्हिल हॉस्पिटल/ अलीआवर जंग/जे.जे.हॉस्पिटलचा दाखला.<br>२) स्टॉलधारक लाभार्थी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील कमीत कमी १५ वर्षापासून रहिवासी असलेबाबतचा स्थानिक वास्तव्याचा दाखला (तहसिलदाराकडुन)<br>३) शिधापत्रिकेची छायांकित सत्यप्रत<br>४) आधारकार्ड छायांकित सत्यप्रत.<br>५) बँक पासबुकची छायांकित प्रत |
| **योजनेच्या अटीशर्ती** | १) स्टॉल परवाना हे फक्त दिव्यांग धारकांसाठी असेल.<br>२) दिव्यांग व्यक्तींने स्टॉल परवाना मिळणेकरीता अर्ज करताना कुटुंबातील एका व्यक्तीचे समंतीपत्र घेणे बंधनकारक आहे.<br>३) १८ वर्षावरील सज्ञान दिव्यांगाला स्टॉल परवाना दिला जाईल.<br>४) मा. महासभा ठराव क्र. ३४ दि.०३/०८/२००४ मधील अटीशर्ती नुसार ४X६ चौ. फुटावरच दिव्यांगाना स्टॉल परवाना देण्यात येईल. ४X६ चौ.फुटापैक्षा जास्त जागा अडवल्यास परवाना अटीशर्तीचा भंग केल्याचे कारण दाखवून दिव्यांगाचा स्टॉल परवाना रद्द करुन त्यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्यात येईल.<br>५) ज्या व्यक्तीला ज्या कारणासाठी स्टॉल दिला आहे. त्याप्रमाणे वापर न केल्यास किंवा भाडयाने दिल्यास, अतिरिक्त वाढीव बांधकाम केल्यास, छपरा टाकल्यास स्टॉलधारकाचा स्टॉल जप्त करुन त्यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्यात येईल, व ज्याने भाडयाने घेतला असेल त्याचेवरही गुन्हा दाखल करण्यात येईल.<br>६) सार्वजनिक बांधकाम विभाग, परवाना विभाग, प्रभाग अधिकारी यांचेकडुन प्रभागनिहाय जागा निश्चीती नंतर स्टॉल दिला जाईल दर ३ वर्षांनी त्याबाबत आढावा घेण्यात येईल.<br>७) जागा निश्चिती झालेनंतर सर्वप्रथम ज्यांना परवाना यापूर्वी देण्यात आला आहे, त्यांना प्राधान्यांने स्टॉल परवाना दिला जाईल व उर्वरीत दिव्यांग अर्जधारकांना स्टॉल परवान्यांसाठी उपलब्ध जागेनुसार अर्जाचा विचार केला जाईल.<br>८) दिव्यांग स्टॉलधारकाचे परवाना करीता अर्ज जास्त असतील तर लॉटरी पध्दतीने परवाना दिला जाईल व उर्वरीत स्टॉल अर्जदारांना प्रतिक्षा यादीत ठेवले जाईल.<br>९) दोन स्टॉलमध्ये कमीत कमी ५०० मी. चे अंतर असणे आवश्यक आहे अथवा त्या ठिकाणी योग्य जागा नसल्यास त्यावर समिती निर्णय घेईल.<br>१०) दिव्यांगाना दिलेले स्टॉल भाडयाने देता अथवा घेता येणार नाहीत. तसेच या स्टॉलव्यतिरिक्त अन्य ठिकाणी माझा स्टॉल नाही, असे प्रतिज्ञापत्र देणे बंधनकारक राहील. परवाना दाखल्यावर स्टॉलधारकांचा फोटो लावून तो परवाना स्टॉलच्या दर्शनी भागात लावणे बंधनकारक राहील. तसेच स्टॉलसंबंधी तक्रार प्राप्त झाल्यास |

स्टॉल परवाना रद्द करण्यास माझी हरकत नाही, असे शपथ देणे बंधनकारक राहील.

११) रस्ता रुंदीकरणात जे स्टॉल तोडण्यात आले आहे त्यांना सार्वजनिक बांधकाम विभागाने सुचविल्याप्रमाणे अन्य ठिकाणी पुर्नस्थापना केली जाईल

१२) सद्यस्थितीत दिव्यागांना परवाना देणेसाठी टेलिफोन बुथचा हा व्यवसाय कालबाहय झाला असल्याने टेलिफोन बुथ व तत्सम या व्यवसाय व्यतिरीक्त जनरल सामानाची विक्री, किरकोळ सामान विक्री, भाजीपाला, फळे व दैनदिन लागणा-या वस्तूंची विक्री, घरघंटी, झेरॉक्स मशिन, ई-बुकींग/रेल्वे रिझर्वेशन, भाजी, फळे, फुले, डेअरी उत्पादन, रोजवापरासाठी लागणा-या वस्तु, वर्तमानपत्र, मासिके व वेळोवेळी मा. दिव्यांग कल्याण समितीने सुचविलेले व्यवसाय इ. स्टॉल धारकास स्टॉल मध्ये ठेवता येतील.

१३) तंबाखुजन्य पदार्थ व ज्वलनशील वायुवर (गॅस किंवा स्टोव्ह) निर्माण करण्यात येणा-या पदार्थाची विक्री करता येणार नाही.

१४) दिव्यांग व्यक्तींना स्टॉल बाबत वादात्मक परिस्थिती निर्माण झाल्यास समितीचा निर्णय अंतीम राहील.

१५) दिव्यांग व्यक्तींना स्टॉलची तोडफोड अथवा हानी झाल्यास व्यक्तीशः जबाबदार धरुन त्यांचेकडुन नुकसान भरपाई वसूल केली जाईल.

१६) शासन/मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार बदल करण्यात येतील.

**इतर अटीशर्ती :-**

१) बी.पी.रोड, नवघर स्टेशन ते नवघर रोड, फाटक ते केबिन रोड, ६० फुट रोड भाईंदर (प.), भाईंदर (प.) स्टेशन रोड ते सेंकडरी शाळा, भाजी मार्केट ते कमला पार्क पोलिस स्टेशन, सब वे रोड ते पोलिस स्टेशन, मिरा रोड रेल्व स्टेशन ते रसाज, वर्सोवा ब्रिज ते वेस्टर्न हॉटेल इतर ठिकाणी स्टॉल परवानगी देण्यात येऊ नये.

२) ११ मी. पेक्षा कमी असलेल्या रस्त्यावर बुथ परवानगी देण्यात येऊ नये.

३) धार्मिक स्थळ, शाळा, सार्वजनिक ठिकाणे, पोलिस स्टेशन,इस्पितळे या ठिकाणाहुन १५० मी अतंरापर्यंत स्टॉल परवाने देण्यात येऊ नये.

४) महानगरपालिकेने हया अगोदर ज्या दिव्यांग व्यक्तींना स्टॉल दिलेला आहे. अशा दिव्यांग व्यक्तींना ६० टक्के पेक्षा जास्त दिव्यांगत्व असलेल्या दिव्यांग व्यक्तींना प्रथम प्राधान्य दिले जाईल.

५) एका जागेसाठी दोन दिव्यांग व्यक्तींनी अर्ज केलेला असल्यास त्यांच्या अपंगत्वाची टक्केवारी व त्याचे शहरातील वास्तव्य किती वर्षाचे आहे, यावर त्यांना प्राधान्य देण्यात येईल.

६) स्टॉलधारकाने स्टॉल परवाना घेताना शहरातील स्वतःची स्थावर मालमत्ता असलेल्या व्यक्तीचे हमीपत्र दयावे.

७) ना फेरीवाला क्षेत्राच्या ठिकाणी तसेच रस्त्याच्या ठिकाणी स्टॉल परवानगी देताना समितीची मान्यता घेवुन विशेष बाब म्हणुन